# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १/२००९/ दिनांक :

१) श्री. दिलीप धोंडीबा शिंदे, अर्जदार
मु.पो. बोरगांव, ता. करमाळा,
जि. सोलापूर

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, ऊर्जा नगर,
मुरारजी पेठ, सोलापूर– ००१

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
संवसु विभागीय कार्यालय, बार्शी

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उप विभागीय कार्यालय, करमाळा,
जि. सोलापूर

**कोरम :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, ग्राहक सदस्य यांचे तर्फे दिनांक : ०२.०३.२००९

श्री. दिलीप धोंडीबा शिंदे, मु.पो. बोरगांव, ता. करमाळा, जि. सोलापूर यांनी गट क्र. ११९/१ मध्ये शेतीपंपासाठी ३ एचपीची जोडणी मिळणेसाठी वीज वितरण कंपनीकडे दि. ११.१०.२००६ रोजी अर्ज केला. वितरण कंपनीने कळविल्याप्रमाणे रु. ७९६०/- चे कोटेशन दि. १५.११.२००६ रोजी भरले. तपासणी अहवाल दिला. तथापी वीज वितरण कंपनी जोडणी देत नाही. त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यांना जोडणी द्यावी, पीक नुकसान भरपाई द्यावी. विनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही व्हावी अशी तक्रार 'क्ष' फॉर्ममध्ये केलेली आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर मंडल यांनी पारित केलेला आदेश क्र. ४९४६ दि. १०.७.२००८ मान्य नसल्याने ' अ ' फॉर्ममध्ये कोल्हापूर परिमंडल ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच येथे दि. ३.१.२००९ रोजी तक्रार दाखल केली. त्यास अनुसरुन दि. १०.२.२००९ रोजी सोलापूर सर्कल येथे सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदार श्री.दिलीप शिंदे हे हजर होते. तसेच वि.प.तर्फे विजयकुमार कानडे, सहाय्यक अभियंता, करमाळा उपस्थित होते. सुनावणीच्या दरम्यान केलेली कथने, मूळ तक्रार अर्ज उभयतांनी हजर केलेली कागदपत्रें यावरुन तक्रारदार ग्राहकाची मागणी खालील प्रमाणे आहे.

श्री. दिलीप धों. शिंदे यांनी ३ एचपी शेतीपंपासाठी वीज जोडणीसाठी रितसर वीज वितरण कंपनी करमाळा उप विभागाकडे दि. ११.१०.२००६ रोजी अर्ज केला. वितरण कंपनीने दिलेल्या कोटेशनप्रमाणे रु. ७५६०/- इतकी रक्कम दि. १४.१२.२००६ रोजी जमा केली. तसेच दि. २१.७.२००७ रोजी तपासणी अहवाल दाखल केला. त्यांना सुनावणीच्या तारखेपर्यंत वीज जोडणी मिळाली नाही. अंतर्गत कक्षाने दिलेला प्रतिक्षा यादीतील जेष्ठतेनुसार जोडणी देण्यात यावी अथवा विद्युत अधिनियम २००३ मधील ४६ नुसार महावितरणने खर्चाची रक्कम जमा करुन नंतर बिलातून समायोजन द्यावे. हा निर्णय मान्य नाही. रक्कम भरल्यानंतर वारंवार त्यांनी चौंकशी केली. संबंधितांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. प्रतिक्षा यादी, जेष्ठताक्रम इ. बाबी त्यांनी तक्रार केल्यावरच सांगितल्या. तथापी अंतर्गत कक्षानेही आपल्या निर्णयात त्यांचा जेष्ठता क्रमांक कोणता तसेच कोणत्या सालापर्यंत जोडण्या दिल्या आहेत यांची नोंद केलेली नाही. त्यांचेवर अन्याय झालेला आहे. त्यांना सत्वर जोडणी मिळण्याचे तसेच पिकाची आर्थिक नुकसान भरपाई व विनियमातील तरतुदप्रमाणे दंडात्मक कारवाई करुन सदरची रक्कम वसुलीचे आदेश व्हावेत अशी मागणी आहे.

वि.प. तथा वीज वितरण कंपनीचे म्हणणे खालील प्रमाणे

श्री. शिंदे यांनी ३ एचपी शेतीपंपाच्या जोडणीसाठी दि. १४.१२.२००६ रोजी रु. ७५६०/- कोटेशन प्रमाणे भरले आहेत. त्यांच्या आधीचे सन १९८९ पासूनचे अर्जदार रक्कम भरुन प्रतिक्षा यादीत आहेत. त्यामुळे शिंदे यांना सत्वर जोडणी देणे हे त्यांच्या आधी रक्कम भरलेल्या ग्राहकांवर अन्यायकारक होईल. त्यांचा जेष्ठता यादी क्रमांक ४३० असा आहे. त्यांना त्वरीत जोडणी हवी असल्यास अधिनियम २००३ मधील कलम ४६ प्रमाणे खर्चाची रक्कम जमा केल्यास तशी जोडणी देता येईल. टर्न की ऑर्डरप्रमाणे सध्या काम चालू आहे. त्यात जेष्ठता क्रमांक आल्यास ग्राहकास शेतीपंपासाठी जोडणी देता येईल अशा पध्दतीचे म्हणणे वि.प.ने मांडलेले आहे.

ग्राहकाचा मूळ तक्रार अर्ज, सुनावणी दरम्यानची कथने, व हजर केलेले म्हणणे, दाखल कागदपत्रे, अंतर्गत कक्षाचा आदेश या सर्वांचा एकत्रित विचार करता, पुढील निष्कर्षाप्रत मी पोहोचलो आहे.

श्री. दिलीप शिंदे या तक्रारदाराने ३ एचपी शेतीपंपासाठी वीज जोडणीसाठी दि. ११.१०.२००६ ला अर्ज केला. वीज वितरण कंपनीने SPA /PKLH/175/06-07 ने १ पोल अंतरासाठी क्र. ७९६० चे कोटेशन दिले. ते ग्राहकाने दि. १४.१२.२००६ रोजी भरले व दि. २१.७.२००७ रोजी तपासणी अहवाल सादर केला. तसेच दि.२१.७.२००७ रोजी केएमएल/५५६/०७ ने कपॅसिटर टेस्ट करुन घेतला. या सर्व घटना उभयतांना मान्य आहेत.

ग्राहकाने ३ एचपी शेतीपंपाच्या वीज जोडणीसाठी वि.प.ने कळविल्याप्रमाणे रकमेचा भरणा व कागदपत्रांची पूर्तता करुन जोडणीसाठी लेखी पत्र–व्यवहार केल्याचे व स्वत: संपर्क केल्याचे दिसून येते. प्रथम मागणी अर्ज दि. ११.१०.२००६ पासून अंतर्गत कक्षात तक्रार नोंदणी करेपर्यंत व त्यापुढे सुनावणीपर्यंत व प्रतिक्षा यादी जेष्ठता यादी असा कोणताही विषय पुढे आलेला दिसत नाही. वि.प.ने आपल्या कक्षा पुढील म्हणण्यामध्ये प्रतिक्षा यादीतील जेष्ठता क्रमांकानुसार जोडणी दिली जाईल. सन १९८९ पासून रक्कम भरलेल्यांची जोडणी देणे बाकी असल्याने दि. १४.१२.२००६ रोजी रक्कम भरुन मागणी करणाऱ्या सदर अर्जदारास प्रतिक्षा करावी लागणार व त्वरीत जोडणी हवी असल्यास परिपत्रक क्र. २५६८० दि. १९.६.२००८ नुसार अंदाजपत्रकानुसार ग्राहकाने वीज वाहिनी स्वखर्चाने उभी करुन घ्यावी. कंपनीस सदर वाहिनी उभी करतांनाचा देखरेखीचा खर्च द्यावा. वाहिनी उभारणीचे पैंसे वीज बिलातून वजावट केले जातील असा पर्याय ठेवला. तो अंतर्गत कक्षाने मान्य करुन तसा आदेश पास`ला आहे. सदरचा निर्णय मान्य नसल्याने ग्राहकाने मंचापुढे अर्ज दाखल केला. वि.प.ने मांडलेल्या व कक्षाने दिलेल्या आदेशाशी मी सहमत नाही. त्यामुळे पुढील प्रश्न उपस्थित होतात.

१) प्रश्न :– अर्जदाराचा वीज मागणीचा अर्ज कोणत्या तारखेस परिपूर्ण झाला ?
   उत्तर :– दि. २१.७.२००७ रोजी अर्ज परिपूर्ण झाला.

२) प्रश्न :– अर्जदाराने वीज जोडणीची मागणी केल्यावर विनियमातील तरतुदींची पूर्तता केली आहे काय ?
   उत्तर :– नाही. अर्ज केल्यावर १० दिवसांत तपासणी फी भरुन घेवून तपासणी करणे व तद्नंतर अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ग्राहकाने करावयाच्या खर्चाचा तपशील ३० दिवसांच्या आंत कळविला पाहिजे व नंतर अर्ज परिपूर्ण झाल्यावर वितरण मेन्सचा विस्तार असल्याने ३ महिन्यात जोडणी देणे आवश्यक त्यामुळे कोठेच विनियम तरतुदी पूर्ण केलेली दिसत नाही.

३) प्रश्न :– विनियम तरतुदींचा भंग केल्यामुळे शास्ती वसूल करणे व ती ग्राहकास देणे योग्य आहे का ?
   उत्तर :– होय

४) जेष्ठता यादी व जेष्ठता क्रमांक यादी प्रसिध्दीची तारीख कोणती ? यादीतील नोंदी परिपूर्ण आहेत काय ?
   उत्तर :– तारीख उपलब्ध नाही, नोंदी अद्ययावत नाहीत.

५) आदेश ?
   अखेरच्या आदेशाप्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाचा कृती मानके व भरपाईचे निश्चितीकरण विनियम २००५ हे २० जानेवारी २००५ पासून अस्तित्वात आले आहे. सदर विनियमातील तरतुदी प्रमाणे वीज मागणी अर्ज आल्यापासून त्यास अनुसरुन कार्यवाही करण्याचा कालावधी निश्चित केला आहे. त्या कालावधीमध्ये अर्जाची निर्गत होणे आवश्यक आहे. तसेच न झाल्यास जबाबदार असणाऱ्याने नुकसान भरपाई देणेची तरतूद आहे. सदर प्रकरणी वि.प.चे संबंधित जबाबदार आहेत. वि.प. वेगवेगळया योजनेद्वारे वीज पुरवठा जोडणी देत असते. सदर ग्राहकाचा अर्ज ज्या तारखेस प्राप्त झाला त्यावेळी सुरु असलेली एसपीए योजना होती व सदर योजनेखाली पूर्ण खर्च वि.प.नेच करावयाचा असल्याने व तशीच त्यावेळी मंजुरी देवून ग्राहकाकडून रक्कम जमा करुन घेतल्याचे दिसते. त्यामुळे आज नव्याने अस्तित्वात आलेली परिपत्रक क्र. २५६८० दि. १९.६.२००८ ने डीडीएफ योजनेने जोडणी घेण्याचा पर्याय अयोग्य आहे. ज़ेष्ठता यादीमधील नोंदी तपासता ती नेमकी कोणत्या तारखेस प्रसिध्द झाली आहे व ती कोणकोणत्या सार्वजनिक ठिकाणी लावली होती हे समजत नाही. तसेच सदर ग्राहकास ज्या एसपीए योजनेखाली मंजुरी दिली आहे त्याची नोंद यादीमध्ये नाही. इतरही नोंदी चुकीच्या आहेत. तसेच सदर यादीप्रमाणेच आपणांस जोडणी मिळणार, तुमच्या आधी किती अर्जदार प्रतिक्षेत आहेत याची कल्पना अर्ज घेतानांच देणे आवश्यक होते. तसे केल्याचेही दिसत नाही. त्यामुळे वि.प.ने सुचविलेला डीडीएफ योजनेचा पर्याय व जेष्ठता यादीनुसार जोडणी हे दोन्ही अयोग्य आहे. त्यामुळे त्वरीत वीज जोडणी देणेच योग्य होईल. दि. २१.७.२००७ रोजी अर्ज परिपूर्ण झाला असल्याने व सदर जोडणी वितरण मेन्सचा विस्तार या सदराखाली येत असल्याने दि. २१.७.२००७ ते २०.१०.२००७ ह्या कालावधीनंतर म्हणजेच दि. २१.१०.२००७ नंतर दि. ४.३.२००८ पर्यंतच्या नुकसान भरपाईपोटी १९ आठवडे विलंब x रु. १००/– प्रति आठवड्यास असे रु. १९००/– देणे आवश्यक आहे. सदर नुकसान भरपाई नव्याने देणाऱ्या बिलात समायोजन करावी. ग्राहकास तसे लेखी कळवावे. तसेच ३० दिवसांचे आंत जोडणी देवून मंचास अहवाल सादर करावा.

## <u>आदेश</u>

१) अंतर्गत ग्राहक निवारण कक्ष, सोलापूर सर्कल यांचा आदेश क्र. ४९४६ दि. १८.७.२००८ रद्द करणेत आला आहे.

२) वितरण परवाने धारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण विनियम २००५ मील तरतूद १२ नुसार परिशिष्ट अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे १९ आठवडे विलंबाबद्दल प्रति आठवडा रु. १००/– प्रमाणे रु. १९००/– भरपाईची रक्कम द्यावी व सदरची रक्कम पुढील बिलात समायोजन करावी.

३)	ग्राहकास ३० दिवसाचे आंत वीज जोडणी द्यावी व तसा अहवाल मंचास सादर करावा. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४)	या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( जी. सी. लेले )
सदस्य
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : ०२.०३.२००९

के.वाय. जगताप, अध्यक्ष, :

एस.आर. बांबळे, सदस्य सचिव :